*राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक*

*(पिनॅकल मॉल, ४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)*

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले द्वितीय अपील**

**क्र.रामाआ/नाशिक/द्वितीय अपील क्रमांक ४८४६/२०२२/धुळे**

**क्र.रामाआ/नाशिक/द्वितीय अपील क्रमांक ४८४७/२०२२/धुळे**

**क्र.रामाआ/नाशिक/द्वितीय अपील क्रमांक ५०८४/२०२२/धुळे**

| अपिलार्थी | प्रतिवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी |
| श्री. अंसारी म. तव्वाब म.युसुफ,<br>रा. मौलवीगंज मौलाना आझाद हायस्कूल मागे, धुळे, ता.जि.धुळे. | १.सहायक मुल्य निर्धारण व कर संकलन अधिकारी,<br>धुळे महानगरपालिका, धुळे, नवीन प्रशासकीय इमारत, गुरुशिष्य स्मारक, साक्री रोड, धुळे, ता.जि.धुळे-४२४००१.<br>२.कार्यालय अधिक्षक,<br>लेखा शाखा, धुळे महानगरपालिका, धुळे, नवीन प्रशासकीय इमारत, गुरुशिष्य स्मारक, साक्री रोड, धुळे, ता. जि. धुळे-४२४००१. | १.मुल्यनिर्धारक व कर संकलन अधिकारी,<br>धुळे महानगरपालिका, धुळे, नवीन प्रशासकीय इमारत, गुरुशिष्य स्मारक, साक्री रोड, धुळे, ता.जि.धुळे-४२४००१.<br>२. सहायक आयुक्त,<br>लेखा शाखा, धुळे महानगरपालिका, धुळे, नवीन प्रशासकीय इमारत, गुरुशिष्य स्मारक, साक्री रोड, धुळे, ता. जि. धुळे-४२४००१. |

**द्वितीय अपिल सुनावणी दिनांक – १०/०३/२०२५**

| मुळ अर्ज दिनांक | मुळ अर्ज जमाअ यांना प्राप्त दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज दिनांक | प्रथम अपिल दाखल केल्याचा दिनांक | प्रथम अपिल आदेश दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| ०१/०४/२०२२ व ०९/०३/२०२२ | ०७/०४/२०२२ | ०३/०५/२०२२ | १३/०५/२०२२ | १३/०५/२०२२ | १३/१२/२०२२ |

अपिलार्थी यांनी दि. १२/०८/२०२२ रोजीच्या अर्जान्वये "माहिती वेळेवर, मुदतीत मिळाली नाही.व कोणतीही माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही." असे कारण नमूद करुन कलम १९(३) अन्वये तीन व्दितीय अपिल अर्ज दाखल केले आहेत. सदर द्वितीय अपील अर्जाद्वारे कोणतीही विनंती केलेली नाही.

२. सदर द्वितीय अपिलाच्या सुनावणीस विद्यमान जन माहिती अधिकारी वगळता इतर पक्षकार अनुपस्थित आहेत.

३. अपिलार्थी यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

**द्वि.अ.क्र.४८४६/२०२२/धुळे :-**

तिरंगा चौक शेजारी, ८० फुटी रोड, पुनम टॉवर समोरील मालमत्तेवरील नाव वर्ग करतांना शासनाची तसेच आपली दिशाभुल करुन भ्रष्ट मार्गाने नाव ट्रान्सफर करण्यात आल्याने खालील माहिती उपलब्ध करुन भ्रष्टाचार रोखण्यात मदत करावी. (१) ८० फुटी रोड तिरंगा चौक, शेजारी पुनम टॉवर समोरील असलेल्या दडास्टीक कारखान्याची जागेत पुर्वी म. फारुक अब्दुल हादी हे नाव बदलून म. कासीम म. फारुक हे नाव ट्रान्सफर करतांना आपल्या संबंधित कार्यालयात जे कागदपत्र सादर करण्यात आलेले आहेत त्या सर्व कागद पत्रांच्या प्रमाणित झेरॉक्स प्रति मिळणेस विनंती आहे.

**द्वि.अ.क्र.४८४७/२०२२/धुळे :-**

सन २०१५ ते आजपावेतो या कालावधीतील मौलवीगंज प्रभाग क्र. १३ येथील दोन मालमत्ता वरील नांव ट्रान्सफर करतांना शासनाची, आपल्या खात्याची दिशाभुल करुन भ्रष्टमार्गाने नाव ट्रान्सफर करण्यात आल्याने खालील माहिती मिळणेस विनंती. (१) मौलवीगंज कलंदर चौक येथील रहिवासी इमारत व पॉवरलूम कारखाना या मालमत्तेवर म. फारुक, हाजी अब्दुलहादी या ऐवजी म. कासीम म. फारुक हे नांव ट्रान्सफर करतांना आपल्या संबंधित खात्यात जे कागद पत्र दाखल करण्यात आलेले आहेत, त्या सर्व कागद पत्रांच्या प्रमाणित प्रती मिळवून देणेस विनंती.

**द्वि.अ.क्र.५०८४/२०२२/धुळे :-**

दि. ०१/०१/२०२१ ते ३१/१२/२०२१ या कालावधीतील धुळे महानगरपालिका तर्फे वर्तमान पत्रांना निविदा, महासभा, कर्मचारी भर्ती, टॅक्स बाबत आवाहन तसेच अन्य जाहिराती देण्यात आलेल्या आहेत. त्या जाहिरातीचे वर्तमान पत्र कार्यालयाकडून धुळे मनपा ला बिलाची रक्कम अदा करणे साठी सादर केलेल्या बिलांच्या प्रमाणित झेरॉक्स प्रति मिळणेस विनंती..

४. तद्नंतर अपिलार्थी यांनी जोडपत्र ब मध्ये "माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली नसल्याने " असे कारण नमूद करुन प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये तीन प्रथम अपिल दाखल केले आहेत.

५. सुनावणीवेळी उपस्थित विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांचे दि. ०६/०३/२०२५ रोजी लेखी निवेदन सादर केले असून त्यामध्ये अपिलार्थीने असे नमुद केले आहे की, द्वितीय अपिल आपल्याकडे सादर केल्यानंतर मला काही प्रमाणात माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली असल्याने मला वरील नमुद तिघं जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या विरुध्द सध्या कुठलीही तक्रार राहिलेली नाही. तरी आपणांस विनंती आहे की, वरील संदर्भात नमुद तिघं प्रकरण निकाली काढण्यात यावे.

सबब, प्रस्तुत प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

प्रस्तुत तीन्ही द्वितीय अपीले निकाली काढण्यात येत आहेत.

**(भुपेंद्र गुरव)**
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ नाशिक.

जावक क्र. २८०४

15 APR 2025